**योजना क्र. ३**

## मनपा आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी पध्दतीवर असलेल्या कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे.

<table>
<tr><td>योजना उद्देश</td><td>:-</td><td>मनपा आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी कामगारांच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात ते शिक्षण घेवू शकत नाहीत, त्यामुळे त्यांचा विकास व कुटूंबाची उन्नती खुंटीत होऊ नये याकरीता मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती दिल्यास त्यांची शैक्षणिक प्रगती व गुणवत्ता वाढीस मदत होईल.</td></tr>
<tr><td>कार्यक्षेत्र</td><td>:-</td><td>नवी मंबई महानगरपालिका.</td></tr>
<tr><td>प्रस्तावित लाभार्थी</td><td>:-</td><td>इयत्तानिहाय प्राप्त लाभार्थी संख्येनुसार</td></tr>
<tr><td>अनूदानाची रक्कम<br>(प्रती लाभार्थी)</td><td>:-</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>इयत्ता</th><th>शिष्यवृत्ती रक्कम रु. (वार्षिक)</th></tr>
<tr><td>१.</td><td>१ली ते ४थी पर्यंत (प्राथमिक)</td><td>रु. २,०००/-</td></tr>
<tr><td>२.</td><td>५वी ते ७वी पर्यंत (माध्यमिक)</td><td>रु. ३,०००/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>८वी ते १०वी पर्यंत (उच्च माध्यमिक)</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
<tr><td>४.</td><td>११वी ते १२वी (विद्यालयीन)</td><td>रु. ४,८००/-</td></tr>
<tr><td>५.</td><td>महाविद्यालयीन ते पदवी</td><td>रु. ६,०००/-</td></tr>
<tr><td>६.</td><td>पदवीनंतरचे शिक्षण</td><td>रु. ८,०००/-</td></tr>
<tr><td>७.</td><td>तांत्रिक/व्यवसाय प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी</td><td>रु. ४,०००/-</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td colspan="3">योजनेच्या अटी व शर्ती :-</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">१. नमुंमपा आस्थापनेवर सफाई कामगार व कंत्राटी कामगार म्हणून काम करत असलेबाबत संबंधित स्वच्छता अधिकारी/स्वच्छता निरीक्षक/विभाग प्रमुख यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.<br>२. अर्जदार यांनी मागील शैक्षणिक वर्षातील शिक्षण पूर्ण केलेले असावे.<br>३. अर्जासोबत अर्जादाराने अलीकडील काळात काढलेले पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.<br>४. नवी मुंबई महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी या योजनेकरीता अर्ज करु शकत नाही.<br>५. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.<br>६. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.</td></tr>
<tr><td colspan="3">मनपा आस्थापनेवरील कंत्राटी कामगारांकरीता तरतूदीमधुन :- अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून</td></tr>
</table>

अर्ज विनामुल्य

# नवी मुंबई महानगरपालिका
# शैक्षणिक शिष्यृवत्ती

पालक व पाल्य यांचे पासपोर्ट आकाराचे छायांकित फोटो

**लाभार्थी घटक :-**

**१. विधवा/घटस्फोटित महिलांच्या मुलांना तसेच निराधार मुलांना.**
**२. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील शाळेत जाणाऱ्या इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन पर्यंतच्या मुला-मुलींना.**
**३. इयत्ता १ ली ते महाविद्यालयीन पर्यंतच्या शिक्षणासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना.**
**४. नवी मुंबई क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबातील मुलाना.**
**५. मनपा आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी पध्दतीवर असलेल्या कामगारांच्या मुलांना.**
**६. नवी मुंबई कार्यक्षेत्रातील दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगारांच्या मुलांना.**
**(उक्त पैकी ज्या योजनेकरीता अर्ज भरला आहे, त्यावर अशी ✓ खुण करावी)**

१. विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव :- ----------------------------------------------------------------------------

२. पालकाचे नाव :- ----------------------------------------------------------------------------

३. संपूर्ण पत्ता :- ----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

प्रभाग क्र. ____, ---------------- विभाग, नवी मुंबई.

किती वर्षापासून वास्तव्य ______. संपर्क क्र. ______________________

४. विद्यार्थी सध्या शिकत घेत असलेला वर्ग :- _______

५. शाळेचे नांव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

६. धर्म :- ----------------------------- जात :- --------------------------------

७. कुटूंबाचे उत्पन्न (वार्षिक) :- _________________/-

८. ज्या बँकेत बचत खाते आहे त्या बँकेचा तपशिल (पालक किंवा पाल्य) :- ---------------------------------------- शाखा --------------------

खातेदाराचे नांव :- ----------------------------------------------------------

खाते क्र. :- ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

IFSC Code :- ______________________

---

**<u>हमीपत्र</u>**

मी, ------------------------------------------- हमी देते/ देतो की, वरील विषयात नमूद केलेल्या कारणासाठी माझ्या पाल्यास यापूर्वी या आर्थिक वर्षात महानगरपालिका/शासन वा अन्य संस्थेकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळालेली नाही. सदरील शिष्यवृत्तीचा उपयोग मी माझ्या पाल्याच्या शैक्षणिक उन्नतीसाठी करेल, गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास होणाऱ्या संभाव्य कायदेशीर कारवाईस माझी हरकत असणार नाही. तरी माझ्या पाल्यास शिष्यवृत्ती मिळणेस विनंती आहे.

दिनांक :- ____/____/२०___ **पालकांची स्वाक्षरी/-**

---

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ------------------------------------------------ सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात इ. _________ मध्ये शिक्षण घेत असून त्याला / तिला शासनाकडून मागील वर्षात लाभ घेतला आहे/नाही. घेतला असल्यास रक्कम रु. _______________/-. तरी नवी मुंबई महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत सदर विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ देण्यास हरकत नाही.

दिनांक :- _____/____/२०____ **मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्का**

**<u>कार्यालयीन कामाकरीता</u>**

१. अर्ज क्रमांक :- ___________
२. अर्जदाराने कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे / नाही :- -----------------
३. लाभार्थी पात्र / अपात्र :- -----------------
४. सदर लाभार्थ्यांनी यापुर्वी या आर्थिक वर्षात नवी मुंबई महानगरपालिकेच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही. त्यांनी मागणी केलेल्या योजनेचा लाभ देण्यास मंजूरीस्तव सादर.
५. मागील वर्षी लाभ घेतलेल्या योजनेचे नांव :- --------------------------------------------

**समूहसंघटक (स.वि.वि.)**

---

**छाननी समिती**

**छाननी समितीचा अभिप्राय** - उपरोक्त अर्जातील सादर केलेली माहिती तपासली असून ती बरोबर आहे. सदर अर्ज पात्र / अपात्र आहे. अपात्र असल्यास अपात्रतेचे कारण :- ______________________________________

**समाजसेवक (स.वि.वि.)** **समाजविकास अधिकारी (स.वि.वि.)**

**आवश्यक कागदपत्रे (कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे) -**

१. उत्पन्न रु. २,४०,०००/- च्या आत असलेबाबतचा मा. तहसिदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला. (आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींकरीता आवश्यक)
२. वास्तव्य पुरावा - मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती / निवडणूक ओळखपत्र/मतदार यादीतील नांव/पाणी पट्टी/वीज बिल/आधार कार्ड/३ वर्षाचा भाडे करारनामा/पारपत्र (Pass Port)/रेशनकार्ड/विवाह नोंदणी दाखला/राष्ट्रीयकृत बॅकेचे पासबुक/सलग ३ वर्ष नमुंमपाच्या हद्दीतील शाळेत शिकत असल्याचा पुरावा म्हणून सादर करावा लागेल.
३. विद्यार्थ्याची मागील वर्षाची गुणपत्रिका.
४. मागासवर्गीय असल्यास सक्षम प्राधिका-यांकडील जातीचा दाखला आवश्यक. (मागासवर्गीयांसाठी)
५. विधवा महिलेच्या पतीच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रमाणित प्रत. (विधवा महिलेच्या मुलांकरीता)
६. घटस्फोटित महिला असल्यास न्यायालयाच्या आदेशाची प्रमाणित प्रत/घटस्फोटित महिलांनी मा. न्यायालयात दावा दाखल केलेला असल्यास त्याबाबतची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. (घटस्फोटीत महिलेच्या मुलांकरीता)
७. निराधार मुलांच्या संदर्भात आई-वडिल मयत असलेबाबत दोघांच्याही मृत्यूचा दाखला. (निराधार मुलांकरीता)
८. महिला घरकाम करत असल्यास त्याबाबतचा पुरावा/ओळखपत्र. (घरकाम करणा-या महिलांच्या मुलांकरीता)
९. महिला कचरा वेचक हे काम करत असल्यास त्याबाबतचा पुरावा/ओळखपत्र. (कचरा वेचक महिलांच्या मुलांकरीता)
१०. कुटूंबातील जमिन नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको/एम.आय.डी.सी. यांनी संपादीत केली असावी. त्याबाबतचा दाखला/सातबारा प्रत/अवार्डची नक्कल अर्जासोबत सादर करावी. (प्रकल्पग्रस्तांच्या मुलांकरीता)
११. नमुंमपा आस्थापनेवर कंत्राटी कामगार म्हणून काम करत असलेबाबत स्वच्छता अधिकारी/स्वच्छता निरिक्षक/विभाग प्रमूख/संबंधित ठेकेदार यांचे प्रमाणपत्र. (सफाई कामगारांच्या मुलांकरीता)
१२. अर्जदाराचा पालक नोंदणीकृत मालक / स्वयंसेवी संस्थेचा दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगार असलेबाबतचा पुरावा. (दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगार यांचे मुलांकरीता)

---

**अटी / शर्ती :-**

१. विद्यार्थ्याला मागील वर्षाच्या वार्षिक परिक्षेत किमान ६५% गुण किंवा "अ" श्रेणी मध्ये उत्तीर्ण असावी. (आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांकरीता)
२. विद्यार्थ्याला मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ६०% गुण किंवा "ब" श्रेणी मध्ये उत्तीर्ण असावी. (मागासवर्गीय लाभार्थ्यांकरीता)
३. नवी मुंबई महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी या योजनेकरीता अर्ज करु शकत नाही.
४. अर्जासोबत अलीकडील काळात काढलेले पालक व पाल्याचा पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
५. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
६. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजूर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.